**९. ऐतिहासिक ठेव्यांचे जतन**

**मिथके –** पुराणकथा, दंतकथा.

**भाषाशास्त्र** - भाषाशास्त्राच्या संकुचित व्याख्येनुसार, ते शास्त्र म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोनातून नैसर्गिक भाषांचा अभ्यास.

**शिल्पकला शैली** - शिल्पकला म्हणजे संगमरवरासारखे दगड, धातू, लाकूड इत्यादी कठीण पदार्थ किंवा माती, मेण, पॉलिमर इत्यादी मऊ पदार्थांना आकार देऊन, जोडून अथवा कोरून त्रिमितीय आकृती बनवण्याची कला होय. शिल्पकलेतून बनवलेल्या कलाकृतीस 'शिल्प' असे म्हणतात. मूर्ती, पुतळे तसेच रचनात्मक आकृतिबंध अशा स्वरूपांत शिल्पे घडवली अथवा कोरली जातात. मूर्तीत वेगवेगळ्या बसण्याच्या अथवा उभे राहण्याच्या शैली असतात त्यास डौलही म्हणतात.

**पुरावस्तू** - खूप जुनी वस्तू.

**अश्मीभूत अवशेष** – पुरातन काळातील सजीवांचे (प्राणी, वनस्पती) उत्खननात मिळालेले हाडे, सांगाडे, दात, नखे यासारखे भाग.

**प्राच्य विद्या** -प्राच्यविद्या म्हणजे भारत आणि पौर्वात्य संस्कृती व समाज यातील गणित, व्याकरण, काव्य, चिकित्सा यांचा अभ्यास होय.

**अकारविल्हे** - अकारविल्हे म्हणजे कोणत्याही माहितीची जलद उपलब्धतेसाठी विशिष्ठ क्रमाने केलेली रचना.

**कोशवाङ्मय** - कोश हा वाङ्मयाचा एक प्रकार आहे. कोश म्हणजे शब्दांचा, विविध माहितीचा वा ज्ञानांचा केलेला व्यवस्थित संग्रह. या वाङ्मयप्रकारास संस्कृतमध्ये कोश वा कोष असे म्हणतात. कोश म्हणजे ‘संग्रह'.

**महानुभाव पंथ** - ज्ञानेश्वरांच्या काही काळ अगोदर 'महानुभाव' संप्रदाय महाराष्ट्रात उदयास आला. या पंथाची स्थापना श्री.चक्रधरस्वामींनी केली.